PM-USHA या केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत Erstwhile Model Degree College या घटकाच्या अनुसूचित जमाती उपघटकासाठी मंजूर निधीच्या प्रमाणात केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांना उपलब्ध करुन देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२६/ई- १६६६५६८/विशि-३**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: २७ मे, २०२६.

पहा:-

१. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग शासन निर्णय क्र.F.No.१ (२७)/ PFMS/ २०२० दि.१३.०७.२०२३
२. भारत सरकार, शिक्षा मंत्रालय, उच्च शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. F.No. २४-२७/ २०२६-U.Policy, दि. ३१ मार्च, २०२६
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०७.०५.२०२६
४. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. राप्रसं/ रुसा/ २०२५-२६/९४, दिनांक ०७ मे, २०२६

प्रस्तावना :

PM-USHA या केंद्र पुरस्कृत योजनेकरिता केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के प्रमाणात निधी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानच्या SNA खात्यात कोषागारामार्फत देयक सादर करुन आहरीत करण्यात येत होता. आता या योजनेकरीता SNA-SPARSH या प्रणालीद्वारे निधी वितरीत होणार आहे.

केंद्र शासन, वित्त विभाग व्यय शाखेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण देशात या केंद्र पुरस्कृत योजनांसाठी SNA-SPARSH प्रणालीची अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यामधे राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत सद्यस्थितीत कार्यरत PM-USHA ही केंद्र पुरस्कृत योजना SNA- SPARSH अंतर्गत कार्यान्वित करण्यात आली आहे.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान या केंद्रपुरस्कृत योजनेच्या विविध घटकांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान या योजनेच्या Erstwhile Model Degree College या घटकाच्या अनुसूचित जमाती या उपघटकासाठी केंद्र शासनाने सन २०२६-२७ करीता संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये Mother Sanction वितरीत केली आहे.

त्यानुसार केंद्र शासनाकडून Erstwhile Model Degree College या घटकाच्या अनुसूचित जमाती या उपघटकासाठी प्राप्त केंद्र हिस्सा (१/३) रु. ७५,०००/- व त्यासमरुप राज्य हिस्सा (२/३) रु. १,५०,०००/- इतकी तरतूद राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांना अर्थसंकल्पिय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (BEAMS) वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दिनांक ३१ मार्च, २०२६ च्या पत्रान्वये प्राप्त PM-USHA या केंद्र पुरस्कृत योजनेच्या Erstwhile Model Degree College या घटकाच्या अनुसूचित जमाती या उपघटकासाठी प्राप्त केंद्र हिस्सा (१/३) रु. ७५,०००/- (रुपये पंचाहत्तर हजार फक्त) व त्यासमरुप राज्य हिस्सा (२/३) रु. १,५०,०००/- (रुपये एक लक्ष पन्नास हजार फक्त) इतकी तरतूद राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांना (BEAMS) अर्थसंकल्पिय अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीवर वितरित करण्यास राज्य शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. उपरोक्त निधी मागणी क्र.टी-५, २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठ व उच्च शिक्षण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, ०१ जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०५) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान- पूर्वीचे मॉडेल डिग्री कॉलेज (केंद्र हिस्सा १/३) २२०२ एल ३८९, (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशीर्षाखालील व राज्य हिश्याकरीता निधी मागणी क्र.टी-५, २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठ व उच्च शिक्षण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, ०१ जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०६) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान- पूर्वीचे मॉडेल डिग्री कॉलेज (राज्य हिस्सा २/३) (कार्यक्रम) २२०२ एल ३९८, (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशीर्षाखालील सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून वितरीत करण्यात येत आहे.

३. वरील अनुदानाची सर्व कागदपत्रे व हिशोब महालेखापाल, महाराष्ट्र -१ किंवा प्रकरणपरत्वे महालेखापाल-२, नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून त्यांनी मागणी केल्यास, सर्व कागदपत्रे त्यांचेकडे तपासणी करीता राज्य प्रकल्प संचालक (रुसा) यांनी सादर करावीत.

४. राज्य प्रकल्प संचालक (रुसा) यांना केंद्र शासनाने ज्या प्रयोजनार्थ निधी मंजूर केला आहे त्या निधीचा वापर त्या प्रयोजनासाठी करावा. खरेदी व बांधकामाची मान्यता विद्यापीठ लेखासंहितेनुसार सक्षम प्राधिका-यामार्फत घेण्यात यावी.

५. तसेच, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदी व त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच तद्नंतर वेळोवेळी देण्यात आलेल्या

सूचनांनुसार सदरची खरेदीप्रक्रीया विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर पार पाडावी व विहित कालावधीमध्ये सदरचा खर्च पुर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय आदिवासी विकास विभागाच्या परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/ प्र.क्र.६१/ कार्यासन-६, दिनांक १३.०५.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५२७१५२१३५५३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.05.27 15:22:28 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :**

१. मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्रक्षशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) संचालनालय, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा वअनुज्ञेयता) / लेखापरीक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग,(व्यय-५), (अर्थसंकल्प-३/८), मंत्रालय, मुंबई.
९. आदिवासी विकास विभाग (कार्यासन-६), मंत्रालय, मुंबई
१०.अवर सचिव (अर्थसंकल्प कक्ष), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.निवड नस्ती (विशि -३), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.